# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक २८ मार्च, २०१८

## (सकाळी ०९.०० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**(अ) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ व २)**

(१) **सर्वश्री. संग्राम थोपटे, अमिन पटेल, अस्लम शेख, भारत भालके, जयकुमार गोरे, अमित झनक, कुणाल पाटील, श्रीमती निर्मला गावित, प्रा. वर्षा गायकवाड, ॲड.राहुल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पुणे जिल्हयातील भाटघर, वीर व मुळशी धरणांतर्गत पुर्णत: व अंशत: पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांनी निधी उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावास अद्यापही शासनाने मान्यता न देणे, भाटघर प्रकल्पांतर्गत पुनर्वसित गावांना पोहोच रस्ते, स्मशानभूमी, बस थांबे, प्रसाधन गृहे, ग्रामपंचायत इमारत इत्यादी नागरी सुविधांसाठी सन २०१३-१४ या कालावधीत कोटयवधीचा निधी शासनाने उपलब्ध करुन दिलेला असतांनाही प्रशासनाच्या दिरंगाईमुळे हा निधी अखर्चित राहिल्यामुळे येथील नागरी सुविधांची अपूर्ण असलेली कामे, या प्रकल्पांतर्गत माळवाडी-हर्णस-भुतोंडे या रस्त्यासाठी रु. ९ कोटी ६९ लाखाचा प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे सदर रस्ता वाहतुकीस अत्यंत धोकादायक झाल्यामुळे येथील प्रकल्पासाठी घरे, जमिनी देऊन विस्थापित झालेल्या बाधितांना अनेक गैरसोयीचा सामना करावा लागणे, प्रकल्पबाधितांना उर्वरित नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी रु.१२९ कोटींच्या निधीचा प्रस्ताव गत दोन वर्षापासून मंजूरीअभावी शासनाकडे प्रलंबित असणे, त्याचप्रमाणे वीर प्रकल्पांतर्गत २३ गावांसाठी ५१ कोटी रुपये रक्कमेच्या नागरी सुविधांच्या कामाचा प्रस्तावही शासनस्तरावर प्रलंबित असणे, या प्रकल्पांतर्गत सारोळा-न्हावी-गुणंद या नवनिर्मिती झालेल्या राज्यमार्गासाठी रु. ५ कोटी ५१ लाखाचा निधी अद्यापही उपलब्ध करुन न देणे, भाटघर, वीर व मुळशी येथील नागरी सुविधांची कामे निधी अभावी प्रलंबित असल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, त्यामुळे सन १९७६ पूर्वीच्या प्रकल्पातील पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविण्यासाठी निधी उपलब्ध करुन देऊन प्रलंबित कामे तातडीने पुर्ण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **ॲड. राहुल कुल, श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील भामा आसखेड प्रकल्पासाठी शासनाने जमिनी संपादन करणे, प्रकल्पाचे काम पूर्ण होत असतानाच प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामधून दौंड तालुक्यातील गावांना वगळून पुणे शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी सदर पाणी आरक्षित करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने पुणे महानगरपालिकेचा पाणी वापर ८.५ टीएमसी पर्यंत मर्यादित ठेवण्याचा दिलेला निर्णय, पुणे महानगर पालिकेकडे प्रत्यक्षात ११.५ टीएमसी पाणी वापराचा शासनाचा परवाना असल्याने भामा आसखेडच्या पाण्याची आवश्यकता नसणे किंवा कायदेशीररित्या सदर पाणी आरक्षित करणे शक्य नसणे, मा.लोकप्रतिनिधी यांनी दौंड तालुक्यातील गावे वगळू नये यासाठी वांरवार मागणी करुनही कोणतीच कार्यवाही न होणे, भामा आसखेड प्रकल्पासाठी संपादित केलेल्या काही जमिनींचे गुंजवणी प्रकल्पग्रस्तांसाठी बेकायेशीरपणे वाटप करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई न होणे, सदर वाटप रद्द करण्यासाठी शासनस्तरावर २ वेळा बैठका घेऊनही कुठलाही निर्णय न होणे, त्यामुळे जलसंपदा विभागाने दौंड तालुक्यातील गावे भामा आसखेड प्रकल्पातुन वगळण्याचा निर्णय रद्द करणे, गुंजवणी प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांना वाटप केलेल्या जमिनींचे वाटप रद्द करून बेकायदेशीररित्या वाटप करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक ३ व ४)**

(३) **श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कोल्हापूर येथील प्राईम रुग्णालयाकडून रुग्णांचे आर्थिक शोषण तसेच रुग्णांच्या मृत्यु प्रकरणी रुग्णालयातील डॉ.कौस्तुभ वाईकर यांच्या विरोधात पाच ते सहा रुग्णांनी जिल्हा पोलिस प्रमुख, कोल्हापूर यांचेकडे तक्रार केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये निदर्शनास येणे, डॉ.कौस्तुभ वाईकर यांचेकडे डी.एन.बी. न्युरो पदवी नसतांना न्युरो शस्त्रक्रिया करून रुग्णांचा मृत्यु झाल्याप्रकरणी मेडिकल निग्लिजन्स व प्रोफेशन मिसकन्डक्ट या खाली गुन्हा दाखल करून त्यांची पदवी रद्द करण्याची केलेली मागणी, याप्रकरणी आरोग्य अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका यांना अधिष्ठाता कोल्हापूर यांनी चौकशी करण्याचे दिलेले आदेश, आरोग्य अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका यांनी डॉ.कौस्तुभ वाईकर यांनी कोल्हापूर महानगरपालिकेअंतर्गत न्युरो सर्जन अशी बनावट नोंदणी केल्याप्रकरणी मेडिकल निग्लिजन्स व प्रोफशन मिसकन्डक्ट या खाली

कारवाई करण्याचा अधिष्ठाता, कोल्हापूर यांना अहवाल सादर करणे, अधिष्ठाता, कोल्हापूर यांनी जिल्हा पोलिस प्रमुख, कोल्हापूर यांना हा अहवाल सादर करुनही त्यांनी कोणतीच कारवाई न करणे, तसेच वडूज (जि.सातारा) येथील चारुशिला रुग्णालयातील डॉ.विवेकानंद माने हे ऑरथो डिप्लोमा असतांना व त्यांना शस्त्रक्रिया करण्याचे अधिकार नसतांनाही चुकीच्या पद्धतीने उपचार केल्याप्रकरणी रचना देशमुख, शशिकला गुरव, राजेश सुतार या रुग्णांनी त्यांच्याविरुद्ध दाखल केलेले गुन्हे, राज्यातील पदवी नसलेल्या डॉक्टरांची चौकशी करून त्यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. त्र्यंबकराव भिसे, अमित देशमुख, राधाकृष्ण विखे-पाटील, बबनराव शिंदे, दिलीप सोपल, बसवराज पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"टेंभुर्णी – कुर्डवाडी - बार्शी - लातूर येथील रा.मा. क्र.१४५ वर मोठ्या प्रमाणात अवजड वाहनाची वाहतूक होत असल्याने रस्त्याची झालेली दूरवस्था, शासनाने रस्ते खड्डेमुक्त करण्याची घोषणा करुनही रस्त्यांच्या दूरवस्थेमुळे मोठ्या प्रमाणात होत असलेले अपघात, सदर रस्त्यांच्या दुरुस्तीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, टेंभूर्णी – कुर्डुवाडी – बार्शी – लातूर या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(५) **श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मिरा भाईंदर शहराची विकास योजना शासनाने भागश: मंजूर केलेली असणे, कलम २६ नुसार प्रस्तावित जमीन वापर नकाशा तयार करण्याची कार्यवाही महापालिकेकडे सुरु असणे, सदर प्रारुप विकास योजना शासनास कलम ३० अन्वये अद्याप मंजूरीसाठी सादर झालेला नसणे, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमध्ये सार्वजनिक वापरासाठीची सुमारे १२३ आरक्षणे सीआरझेडने बाधित होत असणे, त्यापैकी फक्त ५६ आरक्षणे विकसित करण्यात आलेली असून उर्वरित आरक्षणे अद्याप विकसित न करण्यात येणे, मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील काजूपाडा, चेना, वर्सोवा, माशाचा पाडा, डाचकुळ पाडा, मांडवी पाडा, राईपाडा या परिसरातील एन.डी.झोन आरक्षित सीआरझेड जागेवर कच्च्या स्वरुपातील झोपडया, गोदाम, फिल्म स्टुडिओ, बेकरी, हॉटेल, लेडीज बार यासारखे अनधिकृत उभारण्यात आलेली बांधकामे, महापालिकेची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता भूमाफीयांनी उभारलेली असणे, या बांधकामांना महापालिका अधिकाऱ्यांच्या संगनमताने बेकायदेशीररित्या नळ जोडणी, टॅक्स आकारणी तसेच विद्युत सेवाही पुरविण्यात येणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींमार्फत सदर अतिक्रमणे

हटविण्याबाबत वेळोवेळी तक्रार करुनही प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नसणे, या प्रकरणी भ्रष्टाचार विरोधी पथकामार्फत सखोल चौकशी करुन संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(६) **सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"बुलडाणा शहरामध्ये सोई-सुविधांचा असलेला अभाव, शहरात सातत्याने निर्माण होणारी कृत्रीम पाणी टंचाई, शहरातील पाणी वितरण व्यवस्थेबाबत प्रशासनाचा हलगर्जीपणा, ९५ टक्के शहरवासीयांना नियमित व सुरळीत पाणी पुरवठा न होणे, कुचकामी झालेल्या जलवाहिन्या बदलण्याची आवश्यकता, शहरातील रस्त्यांची झालेली दूरवस्था, रस्ते बांधकामासाठी प्राप्त होणा-या निधीमध्ये होणारी अनियमितता, शहरातील रस्ते विकासाचे कोणतेही नियोजन नसणे, परिणामी वाहतुकीवर होणारा परिणाम, मागील १०-१२ वर्षापासून निधी अभावी रखडलेले नाट्यगृहाचे बांधकाम, नाट्यगृह बांधकामासाठीची देयके इतर प्रयोजनासाठी वापरल्याने नाट्यगृहाचे बांधकाम प्रलंबित असणे, शहरातील अतिक्रमण हटवुन नगर परिषदेने अतिक्रमीत जागेवरच अस्थाई गाळे बनवुन गाळे वितरीत करतांना अतिक्रमण धारकांची केलेली आर्थिक लुट, अतिक्रमण धारकांच्या पुनर्वसनाचा प्रलंबीत असलेला प्रश्न, शहराच्या विस्तारा सोबतच शहरातील भाजी, धान्य बाजाराचा विस्तार करण्याची आवश्यकता, शहरात मलनिस्सारणाची कोणतीही सुविधा नसणे, गटार व्यवस्थापन नसणे, शहरातील कचरा व्यवस्थापनाचा निर्माण झालेला प्रश्न, सदर कचरा शहराबाहेर अजिंठा पर्वत रांगेत टाकल्याने पर्यावरणावर होणारा दुष्परिणाम, कचऱ्यामुळे नागरिकांच्या जीवीतास निर्माण झालेला धोका, शहरातील बांधकाम परवानगी ऑनलाईन देणे आवश्यक असतांना जुन्याच पध्दतीने परवानगी देणे, बांधकाम परवानगी देण्यासाठी होत असलेले आर्थिक गैरप्रकार, परिणामी फोफावलेले अवैध बांधकाम, मागील १५-१६ दिवसांपासुन शहरातील मुख्य रस्त्यावरील पथदिवे बंद असणे, परिणामी शहरातील कराचा नियमीत भरणा करणा-या ९५ टक्के नागरिकांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष, बुलडाणा शहरातील नागरिकांच्या जीवनावश्यक मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **सर्वश्री. अनिल गोटे, सरदार तारासिंह, शरद सोनावणे, नरेंद्र मेहता, सुनिल केदार, अमर काळे, विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, अस्लम शेख, ॲड. यशोमती ठाकूर वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल**

**मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नवापूर ते नागपूर महामार्गाच्या रस्त्यालगतच्या शासकीय जमीनी भूमाफियांनी अधिकाऱ्यांच्या संगनमताने बनावट दस्तऐवज तयार करुन आपल्या मालकीच्या असल्याचे दर्शवून नुकसान भरपाईची केलेली मागणी, याबाबत शासनाने महसूल आयुक्त, नाशिक विभाग यांनी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे दिलेले आदेश, महसूल आयुक्त यांनी शासनास सादर केलेल्या अहवालात महसूल अधिकाऱ्यांचा सहभाग सिध्द होणे, अधिकाऱ्यांनी ७/१२ उताऱ्यावर नाव लावून १३.५० कोटी रुपयांचे मंजूर केलेले निवाडे, या सर्व प्रकरणात शासनाच्या १३५ कोटी रुपयांचे झालेले नुकसान, परिणामी नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(८) **डॉ. अनिल बोंडे, सर्वश्री. बच्चू कडू, राजेंद्र पाटणी, प्रभुदास भिलावेकर, रमेश बुंदीले, सर्वश्रीमती माधुरी मिसाळ, देवयानी फरांदे, मंदा म्हात्रे, मोनिका राजळे, प्रा. संगीता ठोंबरे, श्रीमती स्नेहलता कोल्हे, प्रा. मेधा कुलकर्णी, प्रा.डॉ. अशोक उईके, डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे राज्य उत्पादन शुल्क मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"अमरावती जिल्ह्यातील वरुड शहराच्या मध्यवस्तीमध्ये देशी दारू विक्रीची पाच दुकाने असणे, सदर परिसरात कपडा मार्केट, किराणा बाजार, भाजीपाला व फळ बाजार असणे, महात्मा ज्योतिबा फुले, महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळे असणे, या परीसरातील बाजारासाठी जाणाऱ्या महिला, कॉलेज व शाळेमध्ये जाणाऱ्या मुली यांना मद्यपीकडून होणारा त्रास, वारंवार भांडणे, दहशतीची स्थिती निर्माण होणे, महिलांची पाचही देशी दारू दुकाने मध्यवस्ती मधून हटविण्याची मागणी असणे, दारूची अनुज्ञप्ती बंद करण्याकरिता घेण्यात येणाऱ्या निवडणुकीमध्ये संपूर्ण प्रभागातील महिला मतदार संख्येच्या ५०% च्या वर महिलांनी आडव्या बाटलीला मतदान करणे आवश्यक असणे, त्यामुळे दारू दुकानदाराला मतदान न करण्याचा मृत, आजारी, प्रभाग सोडून गेलेल्या व अनुपस्थित महिलांचा लाभ मिळणे, दारू दुकानदाराद्वारे मतदान न करण्याकरिता महिलांना प्रलोभने व धाक दाखवून मतदानापासून परावृत्त करणे, त्यामुळे झालेल्या मतदानाच्या ५०% पेक्षा जास्त महिलांनी आडव्या बाटलीला म्हणजेच अनुज्ञप्ती बंद करण्यास मतदान केल्यास अनुज्ञप्ती रद्द करण्याची महिलांची असलेली मागणी, महाराष्ट्रातील विविध गावे, शहरामध्ये मध्यवस्तीत असणारी दारूची दुकाने हटविण्यामध्ये किचकट परंतु दारूच्या परवानाधारकाला सोयीच्या असलेल्या नियमामुळे महिलांना होत असलेल्या त्रासामुळे निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व उपाययोजना."

(९) **सर्वश्री अब्दुल सत्तार, राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक**

**महत्त्वाच्या बाबीकडे सामाजिक न्याय मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यामध्ये सामाजिक न्याय विभागांतर्गत २३८८ अनुदानित वसतीगृह चालविण्यात येणे, सदर वसतिगृहांमध्ये ९९२५२ विद्यार्थी असणे, दिनांक १६ मार्च, १९९८ च्या शासन निर्णयान्वये स्वेच्छा संघटनांमार्फत मागासवर्गीयांची अनुदानित वसतीगृहे चालविण्यात येत असणे, सदर वसतिगृहातील अधीक्षक, स्वयंपाकी, मदतनीस व चौकीदार यांना देण्यात येत असलेले तुटपुंजे मानधन व विद्यार्थ्यांना अत्यल्प अनुदान, त्यामुळे सध्याचा महागाईचा काळ लक्षात घेता कर्मचाऱ्यांचे मानधन व विद्यार्थ्यांच्या अनुदानात वाढ करण्यात यावी, अशी करण्यात येत असलेली मागणी, त्यानुसार सदर प्रस्ताव वित्त विभागाकडे दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी मान्यतेसाठी सादर करण्यात येणे, वित्त विभागाने वसतिगृहच बंद करण्याचा दिलेला अभिप्राय, तसेच वसतिगृह चालविणाऱ्या स्वेच्छा अनुदानीत संघटनांनी सी.एस.आर फंडातून २५ टक्के रक्कमेची खाजगी कंपन्यांकडून मागणी करुन वसतिगृह चालवावे असाही अनाहुत सल्ला देण्यात येणे, त्यामुळे राज्यातील अनुदानित वसतिगृह बंद पडण्याची व मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर शिक्षणापासून वंचित राहण्याची आलेली पाळी, परिणामी वसतिगृह कर्मचाऱ्यांच्या मानधनात व विद्यार्थी अनुदानात तातडीने वाढ करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(१०) **सर्वश्री. अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, संदीप नाईक, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, राणाजगजीतसिंह पाटील, नरहरी झिरवाळ, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, किसन कथोरे, सुरेश लाड, दिपक चव्हाण, श्रीमती सुमन पाटील, श्री. संजय केळकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर येथील शहाड परिसरात असलेल्या सेंच्युरी रेयॉन कंपनीमध्ये दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी विषारी गॅसची गळती होऊन एका कामगाराचा मृत्यु तर अनेक कामगारांना झालेली विषबाधा, सदर कंपनीतील कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना केली जात नसल्याचे उघडकीस येणे, कमी मोबदला देऊन कामगारांकडून अतिरिक्त काम करुन घेण्यात येत असणे, बाधित कामगारांना सहाय्य करणे, कामगारांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करणे तसेच कंपनीतील गॅस गळतीमुळे परिसरातील नागरी वस्तींमधील रहिवाशांचेही धोक्यात आलेले आरोग्य, सदर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन तातडीने उपाययोजना करण्याची येथील लोकप्रतिनिधी, कामगार संघटनांनी शासन तसेच कामगार आयुक्त प्रशासनाकडे दि.१७ फेब्रुवारी, २०१८ रोजी तसेच तद्नंतर वारंवार केलेली मागणी, सदर आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, कंपनीतील कामगारांच्या सुरक्षेबरोबरच परिसरातील नागरीकांच्याही सुरक्षिततेसंदर्भात आवश्यक उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता,

सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**(ब) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) संबंधित निवेदने सभागृहासमोर ठेवणे :-**

(या लक्षवेधी सूचनांची सूची जोडपत्राद्वारे वेगळी वितरीत करण्यात येईल.)

## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे-**

(अ) तारांकित प्रश्न.

(ब) तारांकित प्रश्नाचे सुधारित उत्तर सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**उद्योग मंत्री** : दिनांक १ मार्च, २०१८ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील श्री.अतुल भातखळकर व इतर वि.स.स. यांच्या "नाणार (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील ग्रीन रिफायनरी प्रकल्पाबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक १०४९६१ चे सुधारित उत्तर सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(क) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ३९१ ते ४१८ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे सन २०१० चा १, सन २०१२ चे ४, सन २०१३ चे ६, सन २०१४ चे ११ आणि सन २०१५ चा १ असे एकूण २३ विशेष अहवाल त्यावरील शासनाच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतील.

**(२) वित्त मंत्री** : (क) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या (१) विनियोजन लेखा अहवाल (२) वित्तीय लेखा खंड-१ व खंड-२

अहवाल (३) सामान्य आणि सामजिक क्षेत्र अहवाल (४) आर्थिक क्षेत्र अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाचा चौथा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) गृहनिर्माण मंत्री** : शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांचा सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या वर्षांचा अनुक्रमे पंधरावा व सोळावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : "**राज्यामध्ये मराठा समाजाच्या तसेच इतर मागासवर्गातील आरक्षणाच्या संदर्भात व त्यांच्या मागण्यांसंदर्भात**" या विषयावरील दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी श्री.दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने सभागृहामध्ये मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेल्या आश्वासनाबाबतची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

**(५) आदिवासी विकास मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **आदिवासी विकास विभागाचा** सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(६) जलसंपदा मंत्री** : महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(७) उद्योग मंत्री** : "**राज्यातील औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाच्या दरवाढीबाबत दिनांक ७ जानेवारी, २०१६ पासून लागू केलेले सुधारित दर**" या

विषयावरील श्री.विजय औटी, वि.स.स. यांच्या दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी उत्तरीत झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लोकलेखा समितीचा अडतिसावा अहवाल सभागृहास सादर करणे.**

**चार : पंचायती राज समितीचा दहावा, अकरावा, बारावा व तेरावा अहवाल सभागृहास सादर करणे.**

**पाच : विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांना विधानपरिषदेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती/राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल.**

**सहा : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**सात : शासकीय विधेयके :**

**(अ) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ — महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, कुणाल पाटील, वसंतराव चव्हाण, त्र्यंबकराव भिसे, डी.पी.सावंत, अमिन पटेल, शेख आसिफ शेख रशीद, संग्राम थोपटे, अमर काळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ — महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ — महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही

सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ — महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अमित झनक, संग्राम थोपटे, हर्षवर्धन सपकाळ, जयकुमार गोरे, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ — महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

-----------------------------------------------------------------------------------------

**(ब) विचार पुढे सुरु, खंडशः विचार व संमत करणे :-**

**सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७.**

-----------------------------------------------------------------------------------------

**(क) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स.**

**यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. जयकुमार गोरे, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, अमित झनक, शेख आसिफ शेख रशीद, प्रा.विरेंद्र जगताप, श्री.कुणाल पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ – महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ – महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ – महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ – महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.जयकुमार गोरे, संग्राम थोपटे, अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ – महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.विरेंद्र जगताप, श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ – महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ – महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती, यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ – महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती, यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ – महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती, यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ – महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती, यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री संग्राम थोपटे, अमित झनक, जयकुमार गोरे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ – महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती, यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ – महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती, यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(४)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ — महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ — महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.जयकुमार गोरे, संग्राम थोपटे, अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ — महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ — महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(५)** **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ — महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) (सुधारणा) विधेयक, २०१८.**

---

**(६)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — सिगारेट आणि इतर**

**तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. जयकुमार गोरे, संग्राम थोपटे, अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(७) सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ — श्री.करवीर निवासिनी महालक्ष्मी (अंबाबाई) मंदिर (कोल्हापूर) विधेयक, २०१८.**

---

**आठ : (मंगळवार, दिनांक २७ मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री शंभुराज देसाई, प्रशांत बंब, डॉ. संजय रायमुलकर, डॉ. अनिल बोंडे, सर्वश्री. राजाभाऊ वाजे, राजेंद्र पाटणी, डॉ. शशिकांत खेडेकर, सर्वश्री. बाबुराव पाचर्णे, शिवाजीराव नाईक, डॉ. जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री सुरेश हाळवणकर, प्रकाश आबिटकर, संतोष दानवे, अनिल बाबर, शिवाजीराव कर्डिले, उल्हास पाटील, सुधाकर देशमुख, सुभाष साबणे, उन्मेश पाटील, ज्ञानराज चौगुले, रणधीर सावरकर, किशोर पाटील, श्रीमती देवयानी फरांदे, प्रा. चंद्रकांत सोनावणे, प्रा. मेधा कुलकर्णी, श्री. हर्षवर्धन जाधव, ॲड. राहुल कुल, सर्वश्री. सुरेश धानोरकर, समीर कुणावार, अनिल कदम, डॉ. सुनिल देशमुख, सर्वश्री. शांताराम मोरे, रमेश बुंदिले, सुभाष भोईर, अनिल गोटे, सुरेश गोरे, प्रा. संगिता ठोंबरे, सर्वश्री विजय औटी, चरण वाघमारे, नारायण पाटील, डॉ. विजयकुमार गावीत, सर्वश्री. भरतशेठ गोगावले, विनायकराव जाधव-पाटील, सदानंद चव्हाण, डॉ. सुरेश खाडे, श्री. राजन साळवी, ॲड. लक्ष्मण पवार, सर्वश्री. राजेश क्षीरसागर, हरिभाऊ जावळे, चंद्रदिप नरके, सुधाकर भालेराव, सत्यजित पाटील-सरुडकर, डॉ. पंकज भोयर, डॉ. सुजित मिणचेकर, सर्वश्री संजय सावकारे, संजय शिरसाट, सुरेश भोळे, योगेश घोलप, राजेंद्र नजरधने, अमित घोडा, ॲड. भिमराव धोंडे, सर्वश्री वैभव नाईक, उदेसिंग पाडवी, उदय सामंत, डॉ. आशिष देशमुख, ॲड. गौतम चाबुकस्वार, सर्वश्री. किर्तीकुमार भांगडिया, मनोहर भोईर, तान्हाजी मुटकुळे, रुपेश म्हात्रे, बाळासाहेब मुरकुटे, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री डि. मल्लीकार्जुन रेड्डी, संदिपान भुमरे, कृष्णा गजबे, डॉ. देवराव होळी, डॉ. संजय कुटे, सर्वश्री संजय केळकर, सर्वश्रीमती सीमा हिरे, स्नेहलता कोल्हे, श्री हरिष पिंपळे, डॉ. तुषार राठोड, सर्वश्री महेश लांडगे, मोहन फड, अमल महाडिक, अतुल सावे, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील सिंचनाच्या अपूर्ण असलेल्या

प्रकल्पांना पुरेसा निधी उपलब्ध करणे, अनुशेषांतर्गत प्रकल्प, झुडपी जंगलांमुळे अडलेले प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी पर्यावरणदृष्टया असलेले अडसर दूर करणे, भूसंपादन व पुनर्वसनाच्या कामाची गती वाढवून प्रकल्पग्रस्तांचे परिपूर्ण पुनर्वसन करण्याकरिता कालबध्द कार्यक्रम राबविणे, जलवितरण व लाभक्षेत्र विकास अंतर्गत प्रत्येक सिंचन महामंडळात स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत करावयाची कामे, कृष्णा खोऱ्यातून मराठवाडयासाठी २८ टीएमसी पाणी मिळण्यासाठी पाऊल उचलण्याची गरज, पिण्याचे पाणी, औद्योगिक व कृषी वापराचे पाणी यांचे नियोजन करणे, कालव्याऐवजी पाईप लाईनने सिंचन करणे, सर्व प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे, कालव्याची व उपसा सिंचन योजनांची कामे करुन शेतकऱ्यांना जलसक्षम करणे, उपसा सिंचन योजनेवर सौरऊर्जापंप बसविणे, लाभक्षेत्राबाहेर होणारी पाण्याची चोरी रोखणे, गोदावरी व तापी खोरे जलनियोजन आराखडा तयार करणे, वैनगंगा व नळगंगा जोड प्रकल्प व कन्हान-वर्धा बोगद्याद्वारे नदीजोड प्रकल्पाचा तातडीने अभ्यास करुन हा प्रकल्प कार्यान्वित करणे, पेणटाकळी, खडकपूर्णा, जिगाव व गोसीखुर्द इ. प्रकल्प पूर्ण करण्याबाबत कालबध्द कार्यक्रम आखणे, राज्यातील बहुतांश पाझर तलाव सन १९७२ ते १९८० च्या दुष्काळादरम्यान तयार केलेले असल्याने त्याची सिंचन क्षमता तपासून पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता, शिवकालीन बारव, पायविहिर, चौकोनी विहिर अशा प्राचीन जलस्त्रोतांचे जतन व संवर्धन करण्याची आवश्यकता, हिंगोली जिल्हयातील पूर्णा नदीवरील उच्च पातळी बंधाऱ्यासाठी व ज्या प्रकल्पांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळालेले आहे त्या प्रकल्पांसाठी प्रशासकीय मान्यता देऊन काम सुरु करण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार योजना अधिक गतीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, राज्यातील जलदगतीने पूर्ण होणाऱ्या प्रकल्पांचा पंतप्रधान सिंचन प्रकल्प योजनेत समावेश केला असणे, सन २००८ मध्ये कर्जमाफी न झालेल्या शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचा व दीड लाखांपर्यंतचे कर्ज माफ करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत शासनाने केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने तसेच आदिवासी वनजमिनींचे सर्व दावे ६ महिन्यांत निकाली काढण्याच्या अनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

नऊ : **(मंगळवार, दिनांक २७ मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री. अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, विजय वडेट्टीवार, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब थोरात, जयदत्त क्षीरसागर, अबु आझमी, अब्दुल सत्तार, भास्कर जाधव, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. हसन मुश्रीफ, सुनिल केदार, संदीप नाईक, गोपालदास अग्रवाल, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री. मो. आरीफ नसीम खान, राजेश टोपे, अमित देशमुख, दिलीप सोपल, डि. एस. अहिरे, राणाजगजितसिंह पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. बबनवराव शिंदे, मधुकरराव चव्हाण, राहुल मोटे, डी. पी. सावंत, मकरंद जाधव-पाटील, कालिदास कोळंबकर, सुरेश लाड, बसवराज पाटील, शिवेंद्रसिह भोसले, वसंतराव चव्हाण, दत्तात्रय**

**भरणे, अमिन पटेल, बाळासाहेब पाटील, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री. कुणाल पाटील, संग्राम जगताप, काशिराम पावरा, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, हनुमंत डोळस, अवधूत तटकरे, नितेश राणे, विजय भांबळे, वैभव पिचड, अमर काळे, पांडुरंग बरोरा, अमित झनक, दिपक चव्हाण, रणजित कांबळे, सर्वश्रीमती सुमन पाटील, अमिता चव्हाण, श्री. प्रदिप जाधव-नाईक, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. शेख आसिफ शेख रशीद, राहुल जगताप, श्रीमती निर्मला गावित, श्री. अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबकराव भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, जयकुमार गोरे, पंकज भुजबळ, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील उद्योगाला चालना मिळून उद्योगाची भरभराट व्हावी तसेच शहरी व ग्रामीण भागातील अल्पशिक्षित, सुशिक्षित लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने शासनाने सन १९६४ मध्ये उद्योग संचालनालयाची स्थापना करणे, महाराष्ट्र कारखाना कामगार अधिनियम, १९४८ नुसार विविध उद्योगामध्ये राज्यातील उमेदवारांना नोकरी मिळण्यासाठी व त्यांचे वेतन भत्ते, रजा व इतर सुविधांबाबतच्या तरतूदी करणे, अलिकडच्या काळात झालेल्या तांत्रिक तसेच संगणकीय शिक्षण पध्दतीमुळे टाळेबंदी, कारखाना दिवाळखोरीत काढणे, कारखान्याचे स्थलांतर आदी कारणामुळे कामगार कपात करण्याची कारखानदारांची प्रवृत्ती, राज्यातील अंगणवाडी सेविका मदतनीस व आशाताई म्हणून काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यासाठी केलेला बेमुदत संप, शासनाने या मागण्याबाबत सहानुभूतीने विचार करण्याचे आश्वासन देऊन देखील त्याप्रमाणे अद्याप कार्यवाही न करणे, राज्यातील शिक्षकांनी व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी केलेला बेमुदत संप, शासकीय कर्मचाऱ्यांनी सातवा वेतन आयोग व निवृत्तीची वयोमर्यादा वाढविण्याबाबत पुकारलेला संप, एस. टी. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी वेतनवाढ व इतर मागण्यांसाठी केलेला संप, शासनाच्या विविध विभागातील अ ते ड श्रेणीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची जवळजवळ २ लाख पदे रिक्त असतांना संगणकीकरण, आऊट सोर्सिंग व विशेषज्ञ या नावाखाली ३० टक्के याप्रमाणे जवळजवळ ५.५० लाख पदे रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेणे, एकीकडे उद्योगधंदा वाढविण्याबाबतची घोषणा करुन रत्नागिरी जिल्हयात होऊ घातलेल्या नाणार औष्णिक प्रकल्पाची घोषणा करुन लगेच सदर प्रकल्प बंद करण्याची घोषणा करणे, कामगार खाते व अधिकाऱ्यांवर शासनाचा वाढता दबाव, माथाडी मंडळे मोडीत काढून तेथे एक महामंडळ नेमण्याचे शासनाचे धोरण, त्याविरुध्द कामगारांचा विरोध, शासनाच्या प्रत्येक विभागात सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना एक रकमी वेतन करार पध्दतीने नोकऱ्या देणे, नविन भरती न करणे, परिणामी सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढणे, महाराष्ट्राला एक नंबरचे राज्य करण्याच्या अट्टाहासापोटी मेक इन इंडियाच्या नावाखाली मेक इन महाराष्ट्र, स्टार्ट अप, अमृतसिटी, स्मार्ट सिटी, समृध्दी महामार्ग यासारखे खर्चिक प्रकल्प कार्यान्वित करण्याचा केलेला अट्टाहास, महाराष्ट्र नं. १, मॅग्नेटीक महाराष्ट्र अशा केवळ प्रसिध्दीसाठी केलेल्या सदर

प्रकल्पामुळे राज्यात ३८.८३ लाख नोकऱ्या, ५० लाख तरुण-तरुणींना कौशल्य प्रशिक्षण देणे, मॅग्नेटीक महाराष्ट्रामधून ३६ लाख ७७ हजार नोकऱ्या उपलब्ध होतील असे दिशाभूल करणारे आश्वासन तरुणांना देणे, केंद्रीय कामगार मंत्रालयाने नुकत्याच केलेल्या सर्वेक्षणानुसार कारखानदारीच्या क्षेत्रात ५४ हजार कंत्राटी व ७२ हजार हंगामी नोकऱ्यांवर आलेले गंडांतर, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, २००२ मध्ये कामगार धोरणाविरुध्द सुधारणा करण्यास सुरक्षा रक्षक संघटनांनी केलेला विरोध, शासनाने आततायीपणे निर्णय घेतल्यास सुरक्षा रक्षक संघटनांकडून तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, कामगार आयुक्तालयात उपायुक्त वा तत्सम दर्जाची अनेक पदे रिक्त असल्याने कामाच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्यांची वरिष्ठांकडून होणारी छळवणूक व अत्याचाराला आळा घालण्यासाठी करावयाची उपाययोजना, राज्यात आजघडीला सुशिक्षित बेरोजगार तरुणांची ६० लाखापर्यंत पोहचलेली संख्या, त्यापैकी केवळ १ टक्का बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करुन दिले जात असणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने मध्यतंरी हमाल (कुली) या पदासाठी इयत्ता ४ थी अशी शैक्षणिक पात्रता असतानाही या पदासाठी उच्च विद्याविभूषित सुशिक्षित बेरोजगारांचे २४२४ इतके आलेले अर्ज, उच्चशिक्षण घेऊनही नोकरी मिळत नसल्याने समाज विघातक कृत्य करणाऱ्या टोळ्यांमध्ये सामील होण्याकडे तरुणांचा वाढत असलेला कल, मुंबईतील कामगार न्यायालयात ८१४२ पेक्षा जास्त खटले प्रलंबित असून त्यापैकी १२२ खटले तर गेल्या दहा वर्षापासून निर्णयाअभावी प्रलंबित असणे, राज्यात राज्यस्तरावर कामगारांसंदर्भात असलेल्या ७ कायद्यांची अंमलबजावणी परिणामकारक करुन कामगारांना न्याय न देण्याचे आडमुठे धोरण शासनाने अवलंबिणे, शासनाच्या उद्योग व कामगार विभागामध्ये परस्पर समन्वय नसणे ही बाब विचारात घेता शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची उपाययोजना."

दहा : **(मंगळवार, दिनांक २७ मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव)**

**अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री भास्कर जाधव, अब्दुल सत्तार, गोपालदास अग्रवाल, अबु आझमी, मो. आरीफ नसीम खान, सुनिल केदार, दिलीप सोपल, मधुकरराव चव्हाण, ॲड यशोमती ठाकूर, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री अमिन पटेल, डी.एस.अहिरे, राहुल मोटे, डी.पी.सावंत, हसन मुश्रीफ, बसवराज पाटील, शिवेंद्रसिंह भोसले, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, नितेश राणे, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, संग्राम थोपटे, रणजित कांबळे, डॉ.संतोष टारफे, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री कुणाल पाटील, हनुमंत डोळस, काशीराम पावरा, जे. पी. गावित, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, अमर काळे, अमित झनक, कु.प्रणिती शिंदे, श्रीमती अमिता चव्हाण,**

**सर्वश्री भाऊसाहेब कांबळे, शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री अस्लम शेख, त्र्यंबकराव भिसे, जयकुमार गोरे, भारत भालके, सिध्दाराम म्हेत्रे, पांडुरंग बरोरा, कालिदास कोळंबकर, संग्राम जगताप, संजय कदम, सुरेश लाड, दिपक चव्हाण, श्रीमती सुमन पाटील, श्री. पंकज भुजबळ, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

" राज्यातील शेतकरी कर्जबाजारीपणासह विविध नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात असताना शेतमालाचे पडलेले भाव, त्यामुळे शेतकरी पूर्णपणे उध्वस्त होण्याची आलेली वेळ, राज्यात तूर खरेदी-विक्रीत झालेला घोटाळा, राज्यातील विविध विभागांच्या प्रकल्पांसाठी करण्यात आलेले भूसंपादन, समृध्दी महामार्गाला योग्य मोबदला न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली निराशेची भावना, चुकीच्या मुल्यांकनाच्या आधारे कोटयवधीचा मोबदला मिळवून देणारी टोळी कार्यरत असल्याच्या उघडकीस आलेल्या घटना, खंडणीचा गुन्हा दाखल झाल्यामुळे सक्तीच्या रजेवर पाठविल्यानंतर निवृत्त झालेल्या एमएसआरडीसीच्या व्यवस्थापकीय संचालकांची चौकशी अहवाल येण्यापूर्वीच पुनर्नियुक्ती करुन भ्रष्टाचाराला घातलेले खतपाणी, राज्यातील नागपूर, पुणे, पिंपरी-चिंचवड, ठाणे, कल्याण-डोंबिवली इ. महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचातीमध्ये होत असलेला भ्रष्टाचार, मुंबई महानगरपालिकेच्या रस्ते व नाले सफाईच्या संदर्भातील गैरकारभाराची अनेक प्रकरणे उघडकीस येऊनही या प्रकरणी कोणतीच कारवाई न होणे, एमएमआरडीएचा प्रादेशिक आराखडा अंतिमतः मंजूर करताना वसई-विरार भागातील सर्वात जास्त हरकती व सूचना येऊनही त्या विचारात न घेता भ्रष्टाचाराचा अवलंब करुन टाकलेली आरक्षणे, तसेच विशिष्ट हेतूने कांदळवनांसंबंधीच्या आरक्षणात केलेले बदल, सोलापूर महानगरपालिकेने हरकत घेऊनही आरक्षित जागेवर केलेले अनधिकृत बांधकाम, खाडीचे पाणी पिण्यायोग्य करण्यासाठी सुरु केलेल्या प्रकल्पात झालेला भ्रष्टाचार, ठाणे परिसरात समूह विकास योजना घोषित करुनही त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यात राजकीय हस्तक्षेपामुळे निर्माण होत असलेले अडथळे, मीरा-भाईंदर महापालिकेत भिवंडी तसेच ठाणे परिसरातील महसूल व महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट कारभारामुळे मोठया प्रमाणावर अनधिकृतपणे उभारलेली रासायनिक तसेच इतर गोदामे व त्यांना वारंवार लागणाऱ्या आगींमुळे होणारी जिवीत व वित्तहानी, गोदामामुळे नेहमीच होणारी वाहतुकीची कोंडी, पुरेशा निधी अभावी विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील रखडलेले सिंचन प्रकल्प, कालव्यांची दूरवस्था, प्रकल्पग्रस्तांचे रखडलेले पुनर्वसन, विविध स्थानिक स्वराज्य संस्थांतील सफाई कामगारांच्या समस्यांकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, सीआरझेडमुळे ७२० कि.मी.च्या कोकण किनाऱ्यावरील धूपप्रतिबंधक बंधारे व खारजमिनीसंदर्भात गेल्या ४ वर्षात कोणत्याही उपाययोजना न केल्यामुळे फूटणारे बंधारे व शेतीचे होणारे नुकसान, परिणामी कोकणवासीय जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

# " राष्ट्रगीत "

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २७ मार्च, २०१८

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.